दैनिक अग्रलेख
मुख्य संपादक - उमेश मारुती घेरे

# प्रगती महाविद्यालयात क्विक हील सायबर सुरक्षा क्लब स्थापना

**डोंबिवली** (अग्रलेख वृत्तसेवा) - डोंबिवली येथील ठाणे जिल्हा आगरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या प्रगती महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेच्या क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांची पुण्यातील प्रसिद्ध क्विक हील फाउंडेशनतर्फे आयोजित विशेष प्रशिक्षण सत्रासाठी निवड झाली असून, ही गोष्ट त्यांच्या मेहनती व क्षमतेची पावती आहे. या यशाच्या निमित्ताने व नवीन कार्यकारिणीचे स्वागत करण्यासाठी महाविद्यालयात सायबर क्लब स्थापनेचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ. धनंजय वानखेडे, उपप्राचार्या डॉ. कीर्ती बराड व शिक्षक समन्वयक रुपाली पाटील यांच्या स्वागताने करण्यात आली. त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी दिलेल्या मार्गदर्शनाची आणि पाठिंब्याची दखल घेण्यात आली. त्यानंतर माजी क्लब अध्यक्ष देवेन पाटील आणि माझी सचिव गौरव कुमार यांचा दोन वर्षांचा उत्कृष्ट योगदानाबद्दल गौरव करण्यात आला. त्यानंतर समन्वयक रुपाली पाटील यांनी



या प्रकल्पाची सविस्तर माहिती दिली. सायबर हल्ले, सोशल मीडिया फ्रॉड, डेटा प्रायव्हसी, त्याचे उद्दिष्ट व विद्यार्थ्यांसाठी फायदे याबद्दल सांगितले. तसेच, नव्या सायबर वॉरियर्सना प्रेरणा देत त्यांनी प्रकल्पात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले.प्राचार्यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि प्रेरणादायी भाषण दिले आणि सायबर सुरेक्षेच्या आजच्या काळातील गरजेबाबत अधोरेखित केले. कार्यक्रमात एक प्रेरणादायी भाग म्हणजे माजी अध्यक्ष देवेन पाटील आणि सचिव गौरव कुमार यांनी आपले अनुभव सांगितले. त्यांनी सायबर वॉरियरपासून क्लब अधिकारी बनण्याचा प्रवास उलगडला आणि नवीन कार्यकारिणीसाठी प्रेरणा निर्माण केली. त्यानंतर, या वर्षीच्या क्लब ऑफिसर्स श्रुती साहू (प्रेसिडेंट), आदर्श उपाध्याय (सेक्रेटरी), अंजली दाभोळकर (ॲक्टिव्हिटी डायरेक्टर), आणि गायत्री गन्नौरे (मीडिया डायरेक्टर) व सायबर वॉरियसचा सत्कार करण्यात आला. त्यांना सायबर वॉरियर बॅज आणि गुलाब पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाची सांगता गेल्या दोन वर्षातील सायबर वॉरियर्सच्या प्रेरणादायी प्रवासाचा व्हिडिओ दाखवून करण्यात आली हा व्हिडिओ नव्या कार्यकारीसाठी ऊर्जा आणि पेरणेचा स्त्रोत ठरला. या कार्यक्रमाच्यासूत्रसंचालनाची जबाबदारी भूमी येवले हिने उत्तम प्रकारे पार पाडले. कार्यक्रमाच्या शेवटी, श्रुती साहू (प्रेसिडेंट) यांनी मनोगत व्यक्त केले. या विशेष यशामध्ये क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, सह-संचालक अजय शिर्के, तसेच सक्रीय टीम सदस्य साक्षी लवंगारे, गायत्री केसकर व दीपु सिंग यांचे मोलाचे योगदान राहिले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेच्या क्षेत्रात नवे दालन खुले झाले आहे.